संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20

17 APR 2025

प्राप्त झाले सही....................

श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे तत्कालीन लेखाधिकारी, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांना निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करुन पदस्थापना करण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र. २३/कोषा-प्रशा-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ एप्रिल, २०२५

संदर्भ : शासन आदेश, वित्त विभाग क्र. निलंबन-२०२४/प्र.क्र. १९ /कोषा-प्रशा-१, दिनांक २२.०२. २०२४

**शासन आदेश**

श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे तत्कालीन लेखाधिकारी, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-४ च्या पोटनियम (२) (अ) मधील तरतूदीनुसार दिनांक २२.०२.२०२४ च्या आदेशान्वये दिनांक ०८.०२.२०२४ पासून निलंबित करण्यात आले आहे.

२. प्रशासकिय विभाग स्तरावर गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीसमोर उपरोक्त निलंबीत अधिकारी यांच्या निलंबनाचा आढावा दिनांक ०६.०३.२०२५ रोजी घेण्यात आला आहे. सदर निलंबन आढाव्यात श्री. शिंदे यांचे निलंबन रद्द करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्याची शिफारस विभागाच्या निलंबन आढावा समितीने केली असून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २०.०४.२०१३ च्या परिपत्रकानुसार त्यांचा मूळ महसूली विभाग व ते निलंबनापूर्वी ज्या महसूली विभागात कार्यरत होते तो महसूली विभाग वगळून अन्यत्र अकार्यकारी पदावर त्यांची पुन:स्थापना करण्याची शिफारस निलंबन आढावा समितीने केली आहे.

३. सदरची शिफारस विचारात घेऊन खालील विवरणपत्रामध्ये निलंबीत अधिकारी श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे यांना मा. न्यायालयीन निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे. श्री. शिंदे यांना पुन:स्थापित केल्यानंतर त्यांची पुढीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

00479/2025/658
21.4.2025

| अ.क्र. | निलंबीत अधिकारी यांचे नाव, पदनाम व कार्यालय | मूळ महसूली विभाग | निलंबनापूर्वी कार्यरत असतांनाचा महसूली विभाग | निलंबन आढावा समितीची शिफारस विचारात घेऊन प्रस्तावित पुन:स्थापना /पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे, तत्कालीन लेखाधिकारी श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर. | पुणे | छत्रपती संभाजीनगर | महसूली विभाग -नागपूर लेखाधिकारी,सुदुर संवेदन उपाययोजन केंद्र, व्हि.एन.आय.टी. परिसर, दक्षिण अंबाझरी मार्ग,नागपूर. |

४. श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे , लेखाधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत रुजू होऊन त्याबाबतचा रुजू अहवाल शासनास सादर करावा, अन्यथा त्यांची ही अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल, तसेच त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय हा मा. न्यायालयीन निर्णय व विभागीय चौकशीचा निर्णय यावर अवलंबून राहील.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. सिध्देश्वर मधुकर शिंदे लेखाधिकारी, (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

प्रत-

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र- १ व २ मुंबई/नागपूर*
(२) महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.*
(३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(४) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(५) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी , मुंबई*
(६) जिल्हाधिकारी धाराशिव, धाराशिव*
(७) संचालक, लेखा व कोषागारे महाराष्ट्र मुंबई *
(८) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया *
(९) संचालक, सुदुर संवेदन उपाययोजन केंद्र,व्हि.एन.आय.टी. परिसर,दक्षिण अंबाझरी मार्ग,नागपूर.*
(१०) कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(११) निवडनस्ती (कोषा-प्रशा-१)
(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)